ठाणे, शुक्रवार दि. १६ ऑगस्ट २०२४ वर्ष : १३, अंक : १०९ , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

**न्यायाची अपेक्षा**

प्रत्येक नागरिकाने मन लावून काम केले पाहिजे. राष्ट्रनिष्ठा जागृत करून देशाच्या विकासात योगदान दिले पाहिजे.सर्वसामान्य माणसाला सर्व अधिकार आणि हक्क देण्याचे कार्य भारतीय राज्यघटनेने दिले आहे.

......पान २ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**

कमाल ३६° से | किमान २९° से

**बाजार**

सोने ७३,२८० | चांदी ९३,६८०

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



तुम्हाला खात्रीनं बरं व्हायचं असेल तर माझ्या खाजगी दवाखान्यात यावं लागेल. बिलाची तयारी करून......

# युनिफॉमऐवजी सेक्युलर सिव्हील कोड, एक देश एक निवडणूक, मोदींची हाक

**नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाच्या ७८ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त देशवासीयांना संबोधित केले. लाल किल्ल्यावरून केलेल्या या भाषणात मोदी यांनी अनेक मुद्द्यांवर भाष्य केलं. देशाच्या राजकारणातील घराणेशाही निष्ट होणे गरजेचे आहे. देशात एक देश एक निवडणूक धोरण लागू होणे गरजेचे आहे, असे नरेंद्र मोदी आपल्या भाषणात म्हणाले. तसेच आपल्या भाषणात त्यांनी देशात 'सेक्यूलर सिव्हील कोड' (धर्मनिरपेक्ष नागरी संहिता) लागू करण्याची गरज आहे, असे मतही व्यक्त केले. देशभरात सातत्याने सुरु असलेल्या निवडणुका या देशाच्या प्रगतीत अडथळा बनत आहेत. त्यामुळे देशाच्या विकासात अडचणी येत आहेत. त्यामुळे आता संपूर्ण देशाने 'एक देश, एक निवडणूक' हे धोरण अंमलात आणण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे, असे महत्त्वपूर्ण वक्तव्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. तब्बल ९७ मिनिटांच्या आपल्या भाषणात पंतप्रधान मोदी यांनी विविध मुद्द्यांना स्पर्श केला. मात्र, त्यांच्या भाषणातील सेक्युलर सिव्हिल कोड आणि वन नेशन, वन इलेक्शन हे दोन मुद्दे विशेष लक्ष वेधून घेणारे ठरले.**



## नरेंद्र मोदी काय म्हणाले ?

सर्वोच्च न्यायालयाने याआधी अनेकवेळा समान नागरी कायद्यावर चर्चा केलेली आहे. अनेकवेळा याबाबत आदेश दिला आहे. ज्या नागरी कायद्याला घेऊन आपण जगत आहोत, तो एका प्रकारे सांप्रदायिक कायदा आहे. हा भेदभाव करणारा कायदा आहे. आज आपण संविधानाचे ७५ वर्षे साजरे करत आहोत. संविधान निर्मात्यांचे स्वप्न पूर्ण करणे आपली जबाबदारी आहे. या गंभीर विषयावर चर्चा व्हायला हवी, अशी आशा मोदी यांनी व्यक्त केली.

## कम्यूनल सिव्हील कोडमध्ये ७५ वर्षे घालवली

तसेच, प्रत्येकाने आपापले विचार मांडावेत. जे कायदे धर्माच्या आधारावर देशाची विभागणी करतात, जे कायदे उच्च-नीचतेचं कारण बनतात, अशा कायद्यांना आधुनिक समाजात कोणतेही स्थान नाही. म्हणूनच एक सेक्यूलर सिव्हील कोड असायला हवा, अशी देशाची मागणी आहे. आपण कम्यूनल सिव्हील कोडमध्ये ७५ वर्षे घालवली आहेत. आता आपल्याला सेक्यूलर सिव्हील कोड स्वीकारणे गरजेचे आहे. देशात धर्माच्या आधारावर जो भेदभाव केला जातोय, सामान्य नागरिकांना जो दुरावा जाणवतो, त्यापासून आपल्याला यामुळे मुक्ती मिळेल, असेही नरेंद्र मोदी म्हणाले.

## एक देश, एक निवडणूक धोरणावर मोदी काय म्हणाले ?

तसेच पंतप्रधान मोदी यांनी देशात सातत्याने सुरु असलेल्या निवडणुकांबाबत भाष्य करताना म्हटले की, देशात कोणतीही योजना राबवायला गेले की त्याचा संबंध निवडणुकीशी जोडला जातो. निवडणूक आली म्हणून योजना आली, असे बोलले जाते. एकूणच सगळ्या गोष्टींचा संबंध निवडणुकीशी जोडला जातो. यादृष्टीने One Nation One Election या धोरणाबाबत व्यापक चर्चा झाली आहे. राजकीय पक्षांनी याबाबत आपले विचार मांडले आहेत. एका समितीने याबाबत चांगला अहवाल मांडला आहे. आता संपूर्ण देशाने वन नेशन, वन इलेक्शनसाठी पुढे आले पाहिजे. त्यासाठी सगळ्या राजकीय पक्षांनी पुढाकार घेतला पाहिजे. भारतातील स्रोतांचा वापर जास्तीत जास्त सामान्य लोकांसाठी करता यावं, त्याचा अपव्यय कमी व्हावा यासाठी देशात वन नेशन, वन इलेक्शन धोरणाची गरज आहे, असे पंतप्रधान मोदी यांनी सांगितले. पंतप्रधान मोदी यांचे हे वक्तव्य अनेक अर्थांनी महत्त्वाचे मानले जात आहे.

## १ लाख तरुणांना राजकारणात आणणार: मोदी

पंतप्रधान मोदी यांनी आपल्या भाषणात आणखी एका गोष्टीचा उल्लेख केला. देशातील घराणेशाही, जातीयवाद भारताच्या लोकशाहीचे नुकसान करत आहे. यापासून देशाला मुक्ती मिळाली पाहिजे. त्यासाठी एक मिशन हाती घेतले जाणार आहे. या मिशनअंतर्गत देशातील राजकारणात १ लाख तरुणांना पुढे आणले जाईल. या तरुणांना कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसेल, त्यांचे वडील, काका किंवा मामा कोणीही राजकारणात नसेल. हे तरुण जिल्हा परिषद, पंचायत, विधानसभा किंवा लोकसभा कुठेही काम करतील. या तरुणांनी कोणत्या पक्षात यावे, याची सक्ती नाही. ते कोणत्याही पक्षात जाऊ शकतात. मात्र, यामुळे देशाला घराणेशाही आणि जातीयवादापासून मुक्ती मिळेल, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला.

**थोडक्यात घडामोडी**

## कसा स्वातंत्र्यदिन विद्यार्थ्यांनी साजरा करायचा ?– आव्हाड

मुंबई – शैक्षणिक वर्ष सुरू होऊन जवळपास दोन महिने लोटले तरी शालेय विद्यार्थ्यांपर्यंत गणवेश पोहोचलेला नाही. परिणामी स्वातंत्र्यदिनी अनेक विद्यार्थी गणवेशविना राहिले आहेत. यावरून शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी टीका केली आहे.

दरवर्षी शालेय स्तरावर होणारी गणवेश खरेदीची पद्धत मोडीत काढून राज्याच्या पातळीवर एकच गणवेश लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला. कंत्राटदार पद्माचंद मिलापचंद जैन यांनी कापलेले कापड गट शिक्षणाधिकारी कार्यालयास पुरवून त्यानंतर स्थानिक महिला बचत गटांद्वारे गणवेश शिवून शाळेत द्यायचे आहेत. मात्र, अद्यापही गणवेश शाळांपर्यंत पोहोचलेले नाहीत. अपवाद वगळता बहुतेक शाळांना गणवेश मिळालेले नसून अनेक शाळा तर अद्याप १०० रुपयांत गणवेश शिवून देणाऱ्या बचतगटांच्या शोधात आहेत.

# कुळगाव बदलापूर नगर परिषद इमारतीचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते लोकार्पण

**ठाणे – आज बदलापूर बदलत आहे. लोक बदलापूरला पसंत करु लागले आहेत. बदलापूरला राहायला यायला लागले आहेत. तुम्ही सांगा आम्हाला महानगरपालिका पाहिजे, तेव्हा महानगरपालिका केली जाईल. सरकार शेवटी लोकभावनेला मदत करणारे आहे. तुमचा आवाज ऐकणारे सरकार आहे, असे विधान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल बदलापूर येथे केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेंतर्गत बांधण्यात आलेल्या उर्दू शाळा क्र. ०२ व कुळगाव बदलापूर नगर परिषद नवीन इमारतीचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले, तेव्हा मुख्यमंत्री शिंदे बोलत होते.**

यावेळी खासदार श्रीकांत शिंदे, सुरेश(बाळ्या) म्हात्रे, आमदार किसन कथोरे, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, कुळगाव बदलापूर नगरपरिषदचे मुख्याधिकारी मारुती गायकवाड, विविध विभागाचे प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, कुळगाव बदलापूर नगर परिषदेची ही इमारत भव्य दिव्य आहे.या इमारतीसाठी मी मुख्यमंत्री असल्याने २५ कोटी रुपये देऊ शकलो. शेती व पायाभूत सुविधामध्ये आपण चांगले काम केले आहे.जे प्रकल्प बंद होते ते आपण सुरू केले. लोक उपोषण **(पान २ वर)**













## लाडक्या सरकारलाही लक्षात ठेवा ; खोडा घालणाऱ्यांना जोडा दाखवा –मुख्यमंत्री

(सविस्तर वृत्त पान २ वर)

**तुम्ही सांगाल तेव्हा महापालिका**

बदलापूर महापालिकेचे हे नवे प्रशासकीय भवन शहराचा कारभार चालविण्यासाठी बहुपयोगी ठरणार आहे. बदलापूर, अंबरनाथ या शहरांचा विकास होतो आहे. मुंबई आणि ठाणे येथील नागरिक या शहरांमध्ये राहण्यास पसंती देत आहे. त्यामुळे अंबरनाथ आणि बदलापूर दोन्ही शहरातील लोकप्रतिनिधींनी एकमताने सांगितल्यास दोन्ही शहरांची मिळून महापालिका स्थापन करण्यात येईल. महापालिका झाल्यास विकासाची अधिक दालने खुली होतील. यामुळे तुम्ही सांगा तेव्हा महापालिका स्थापन करू, अशी स्पष्टोक्ती देखील यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.





## बहिणींच्या खात्यात पैसे आल्याने ठाण्यात जल्लोष

ठाणे -- मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने अंतर्गत राज्यातील बहिणींच्या खात्यात पहिला ३ हजारांचा हप्ता जमा झाल्यानंतर ठाण्यात शिवसेना (शिंदे गट) च्या वतीने पेढे भरवुन जल्लोष करण्यात आला. यावेळी मा. महापौर मिनाक्षी शिंदे, नम्रता भोसले - जाधव, पुजा वाघ, विमल भोईर, मनिषा कोंडुसकर, पुजा जाधव आदिसह शेकडोच्या संख्येने महिला उपस्थित होत्या. (छाया, मनोज सिंह)

## मुंब्र्यातील तिरंगा मिरवणुकीत टिपू सुलतानचे पोस्टर, स्वातंत्र्यदिनानिमित्त एसडीपीआयने काढली होती मिरवणूक




ठाणे : ठाणे येथील मुंब्रा परिसरात गुरुवारी सकाळी सोशल डेमोक्रेटिक पार्टी ऑफ इंडिया (एसडीपीआय) या संघटनेने स्वातंत्र्य दिनानिमित्ताने तिरंगा मिरवणूक काढली होती. या मिरवणुकीत तिरंगा झेंडा आणि महापुरुषांच्या पोस्टरसोबतच टिपू सुलतानचे पोस्टर दिसून आले. दोन दिवसांपूर्वी याच परिसरात लावण्यात आलेले टिपू सुलतानचे पोस्टर पालिका प्रशासनाने काढून टाकले होते.

मुंब्रा शहरात दोन दिवसांपूर्वी टिपू सुलतानचे पोस्टर लावण्यात आलेले होते. हे पोस्टर पालिका प्रशासनाने काढून टाकले होते. हा विषय चर्चेत असतानाच, गुरुवारी सकाळी मुंब्रा शहरात स्वातंत्र्य **(पान २ वर)**

# वसई विरार शहर महानगरपालिका कार्यालयांमध्ये स्वातंत्र्य दिन साजरा

**विरार ( प्रतिनिधी ) – दि.१५ ऑगस्ट, २०२४ रोजी वसई विरार शहर महानगरपालिका मुख्यालय तसेच सर्व प्रभाग समिती कार्यालये येथे स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. महानगरपालिका मुख्यालयात आयुक्त तथा प्रशासक अनिलकुमार पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थितांमार्फत राष्ट्रगीत, ध्वजगीत व महाराष्ट्र राज्यगीताचे गायन करण्यात आले तसेच प्रतिज्ञा घेण्यात आली.**





स्वातंत्र्य दिनानिमित्त केलेल्या आपल्या भाषणात आयुक्त यांनी सर्व नागरिकांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा देऊन सांगितले की, राज्य शासनाने सुरु केलेल्या महत्त्वाकांक्षी योजना महानगरपालिका क्षेत्रात राबविण्यात येत आहेत. राज्य शासनामार्फत मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत प्रत्येक पात्र महिलेला तिच्या स्वतःच्या आधार लिंक केलेल्या **(पान २ वर)**

**७८ व्या स्वातंत्र्यदिन सोहळ्यानिमित्ताने जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न**

# प्रशासन लोकसेवेसाठी कटिबध्द -जिल्हाधिकारी

**ठाणे : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित दादा पवार, पालकमंत्री शंभूराज देसाई व जिल्हयातील इतर सर्व लोकप्रतिनिधींच्या मार्गदर्शनाखाली ठाणे जिल्हा प्रशासन विविध योजनांच्या माध्यमातून अतिशय चांगले कार्य करीत आहे. यापुढेही जिल्हा प्रशासनाकडून गरजू नागरिकांना जास्तीत जास्त योजनांचा लाभ देण्यासाठी प्रयत्न सुरुच राहतील. संपूर्ण ठाणे जिल्हा प्रशासन लोकसेवेसाठी कटिबध्द आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी आज येथे केले. भारत देशाच्या ७८ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त ठाणे जिल्ह्यातील मुख्य शासकीय ध्वजारोहण ठाणे जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी अशोक शिनगारे यांच्या हस्ते ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय आवार येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला, त्यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना ते बोलत होते.**








जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी आपल्या मनोगताच्या सुरुवातीस देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान दिलेल्या सर्व हुतात्मांचे स्मरण करून त्यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन केले आणि भारतमातेच्या ७८ व्या स्वातंत्र्यदिनाच्या या सोहळ्यासाठी उपस्थित असलेल्या सर्व नागरिक बंधू-भगिनींना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या. ते पुढे म्हणाले, देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सक्षम नेतृत्वाखाली आपल्या भारत देशाची जागतिक महासत्ता बनण्याच्या दिशेने वाटचाल सुरू आहे. सन २०४७ पर्यंत भारताला आत्मनिर्भर आणि विकसित राष्ट्र बनविण्यासाठी सर्वांनी एकजुटीने योगदान देण्याचे प्रधानमंत्री महोदयांनी आवाहन केले आहे. विकसित भारताचे स्वप्न साकारण्यात व देशाला जागतिक महासत्ता बनविण्यात महाराष्ट्राचेही योगदान असावे, यासाठी राज्याचे मुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे सुपुत्र एकनाथजी शिंदे,

# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## न्यायाची अपेक्षा

प्रत्येक नागरिकाने मन लावून काम केले पाहिजे. राष्ट्रनिष्ठा जागृत करून देशाच्या विकासात योगदान दिले पाहिजे.सर्वसामान्य माणसाला सर्व अधिकार आणि हक्क देण्याचे कार्य भारतीय राज्यघटनेने दिले आहे. त्यामुळेच सर्व थरातील लोक गुण्यागोविंदाने देशात राहू शकतात. परंतु गेल्या काही वर्षांत कट्टर धर्मवादाची लाट आली आहे. या लाटेत अनेक अल्पसंख्याकांचा शारीरिक, मानसिक छळ होत आहे, हे विसरून चालणार नाही. देशात एकाधिकारशाही येत आहे काय, त्यामुळे सर्वसामान्य माणसाचे जगणे मुश्कील झाले आहे काय, सर्वसामान्यांचा विकास नक्की कशा पद्धतीने केला जात आहे, कुणाचा आवाज दाबण्याचे काम विद्यमान व्यवस्थेत होत आहे काय असे अनेक प्रश्न नागरिकांसमोर आहेत. त्यातच वाढती महागाई, करांचा बोजा, नवीन क्लिष्ट कायदे, अल्पसंख्याकांचे दमन असे अनेक प्रश्न नव्याने सामील झाले आहेत. जेव्हा आपण भारतीय संविधानाप्रमाणे जीवन जगण्याचे वचन व शपथ घेतली आहे, तर त्याप्रमाणे सर्व सामान्य माणसाला जगणे अपेक्षित असते. भारतीय संविधानातील सर्व गोष्टी भारतात अंमलात आणणे गरजेचे आहे. जनतेचे राज्य यावे, अशी अपेक्षा आहे. ज्यांनी स्वराज्याचे स्वप्न साकार करण्यासाठी अतुलनीय धैर्य दाखवले आणि त्यासाठी लढण्यासाठी देशवासीयांचा उत्साह जागवला. स्वातंत्र्यासाठीचे त्यांचे कार्य आणि भारताला गौरवशाली बनवण्यासाठीची त्यांची महत्वकांक्षा आपल्या सर्वांसाठी प्रेरणास्त्रोत आहे. भारतीय स्वातंत्र्यवीरांनी देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी मोठे कष्ट घेतले आहे. देशासमोर सध्या अनेक प्रश्न नव्याने निर्माण झाले आहेत. या प्रश्नांची कौशल्याने सोडवणूक करून नागरिकांना खरे स्वातंत्र्य मिळवून देण्याच आज गरज आहे. जोवर जनतेचे प्रश्न प्रलंबित राहतील,तोपर्यंत लोकशाहीधीष्ठीत समाज म्हणवून घेण्यास सत्ताधारी लायक नसतात. त्यामुळे केंद्र सरकारने सर्व सामान्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याची इच्छाशक्ती ठेवली पाहिजे, असे वाटते. लोकांनी, लोकांसाठी लोकांकरिता चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही होय. लोकशाही प्रक्रियेत लोकांचे प्रश्न मांडणारे विरोधक आणि लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रत्यक्ष धोरणात्मक कार्य करणारे सत्ताधारी हे दोन्हीही महत्वाचे घटक आहेत. यातील कोणीही नीच दर्जाचे नाही. त्याचप्रमाणे सर्वसामान्य माणूस म्हणजे नागरिक हा लोकशाहीतील महत्वाचा घटक होय. घटनात्मक प्रमुख म्हणून राष्ट्रपतींची जबाबदारी महत्वाची होय. तसेच लोकशाहीप्रणीत व्यवस्था सकारात्मक चालवण्यासाठी प्रशासन, लोकांनी निवडून दिलेले सरकार यांचीही भूमिका महत्वाची आहे. हे सर्वजण जेव्हा एकत्र येऊन सकारात्मक, पारदर्शक निर्णय घेतील, अंमलबजावणी करतील त्यावेळी देशातील नागरिक सुखी असणार आहे. जनतेला नेमके हेच अपेक्षित आहे. देशात विकास होत असेल तर तो नक्की कुणाचा ? देशाची संपत्ती, देशाच्या मालकीच्या गोष्टी बाजारात विकल्या जात आहेत काय ? सत्ताधाऱ्यांना देशाचा असा सौदा करण्याची परवानगी भारतीय संविधानाने दिली आहे काय, असे अनेक प्रश्न आता लोकांच्या मनात निर्माण होत आहेत. असे प्रश्न नागरिकांच्या मनात निर्माण होणे, हे सत्ताधाऱ्यांचे अपयश आहे, असे वाटते. जगातील सर्व देश सुखी नाहीत, परंतु किमान सुखी व स्वातंत्र्यात राहण्याची व्यवस्था निर्माण होणे हेच लोकशाहीचे सूत्र असावे, असे वाटते. लोकशाहीत सर्व घटकांचे ऐकून घेऊन त्यावर विचारमंथन करून योग्य तो निर्णय सत्ताधारी पक्ष घेईल, ही अपेक्षा असताना विपरीत गोष्टी घडत आहेत काय, याचेही आत्मपरीक्षण सरकारने करणे गरजेचे आहे.

दरवर्षी देशाला आणि नागरिकांना मिळालेले स्वातंत्र्य, हक्क- अधिकारांची चर्चा केली जाते. परंतु या गोष्टी अंमलात येत आहेत काय, याचे परीक्षण करणारी कोणती यंत्रणा नाही. त्यामुळे सत्ताधाऱ्यांना, आम्ही नेमके काय करतो आहोत, आमचे दोष- गुण काय आहेत याची जाणीव होणे गरजेचे आहे. जनतेने करोना महामारी विरोधात असाधारण दृढनिश्चय आणि कार्यक्षमता दाखवली आहे. असंख्य कुटुंबे भयानक संकटातून गेली आहेत. कोविड महामारीचा प्रभाव अजूनही व्यापक आहे, त्यामुळे आपण सावध राहिले पाहिजे आणि आपल्या बचावात कोणतीही हलगर्जीपणा करू नये. देशभक्तीची भावना देशवासीयांच्या कर्तव्याला अधिक बळकट करते. तुम्ही डॉक्टर असो वा वकील, दुकानदार असो वा कार्यालयीन कर्मचारी, सफाई कामगार असो वा मजूर, तुमचे कर्तव्य निष्ठेने व कार्यक्षमतेने पार पाडणे हे राष्ट्रासाठी तुमचे प्राथमिक आणि महत्त्वाचे योगदान आहे. जनतेला लोकशाहीधीष्ठीत व्यवस्था अपेक्षित आहे, हे सत्ताधारी पक्षाने लक्षात घेण्याची गरज आहे. सर्वसामान्य नागरिकाला न्याय मिळवून देणारी व्यवस्था अपेक्षित आहे.

# भव्य दिव्य तिरंगा पदयात्रेतून देशभक्तीचा उत्सव

**पनवेल (प्रतिनिधी) – देशाचा स्वातंत्र्य दिन विविध सांस्कृतिक कार्यक्रमाने उत्साहामध्ये साजरा झाला. यामध्ये आणखी भर टाकली ती खारघरमध्ये झालेल्या 'भव्य दिव्य ११११ फुट तिरंगा पदयात्रेने. विशेष म्हणजे ही रायगड जिल्ह्यातील सर्वात मोठी तिरंगा पदयात्रा ठरली. ७८ व्या भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टीच्यावतीने खारघरमध्ये आयोजित करण्यात आलेल्या या देशभक्तीच्या उत्सवात हजारो नागरिक, विविध संस्था संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले होते.**



जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेला आपला भारत देश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली 'विकसित भारत' वर लक्ष केंद्रित करून वाटचाल करत आहे. आणि हे होत असताना देशासाठी बलिदान आणि योगदान देणाऱ्या ज्ञात व अज्ञात सर्व स्वातंत्र्यवीरांचे स्मरण कायम केले जाते. त्या अनुषंगाने आजचा दिवस अत्यंत महत्वाचा असतो. हि भावना कायम वृद्धिंगत होण्यासाठी विविध कार्यक्रमे आयोजित करण्यात आली. प्रत्येक भारतीयांसाठी १५ ऑगस्ट हा खूप खास आणि इतिहासात सुवर्ण अक्षरांनी कोरलेला दिवस आहे. स्वातंत्र्य दिनाचे प्रत्येक भारतीयासाठी विशेष महत्त्व आहे. कारण या दिवशी केवळ आपला देशच स्वतंत्र झाला नाही तर या दिवसानंतर पहिल्यांदाच आपल्याला आपले मूलभूत अधिकार मिळाले. हा दिवस देशभरातील लोकांमध्ये राष्ट्रवादी भावना जागृत करतो आणि भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात एकराष्ट्र या संकल्पनेशी एकरूप राहण्याची प्रेरणा देतो. हा केवळ राष्ट्रीय सण नसून या देशाला स्वतंत्र करण्यासाठी ज्यांनी आपल्या तन, मन आणि धनाने बलिदान दिले, त्या शूर वीरांना श्रद्धांजली अर्पण करण्याचा दिवस आहे. त्या अनुषंगाने आजच्या तिरंगा पदयात्रेतून देशभक्तीचा उत्सव अधोरेखित होत होता. यावेळी भारत मातेचा जयजयकार आणि ढोलताशांच्या गजरात संपूर्ण आसमंत दणाणून गेला होता.

खारघर मधील सेक्टर १९ येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल येथून या तिरंगा पदयात्रेला प्रारंभ झाला. ते पुढे मार्गक्रमण करत समारोप उत्सव चौकात झाले. या पदयात्रेत लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, चारुशीला घरत, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी महापौर कविता चौतमोल, जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, पनवेल शहर महिला मोर्चाच्या अध्यक्षा राजेश्री वावेकर, खारघर अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगरसेवक हरेश केणी, डॉ. अरुणकुमार भगत, अभिमन्यू पाटील, अजय बहिरा, मनोहर म्हात्रे, अमर पाटील, शत्रुघ्न काकडे, तेजस कांडपिळे, नरेश ठाकूर, माजी नगरसेविका दर्शना भोईर, संजना कदम, नेत्रा पाटील, अनिता पाटील, नीता माळी, तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, अमित ओझे, समीर कदम, ॲड. आशा भगत, अमर उपाध्याय, भाऊ भगत, प्रदीप भगत, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील, पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, मयुरेश खिस्मतराव, अभिषेक भोपी, प्रवीण बेरा, बिना गोगरी, गीता चौधरी, सपना पाटील, साधना पवार, सुहासिनी केकाणे, संध्या शारबिद्रे, विपुल चौटालिया, ॲड. राजेंद्र अग्रवाल, संतोष शर्मा, यांच्यासह सायकलपटू, हजारो नागरिक, पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा सहभाग होता. एकूणच अत्यंत शिस्तबद्ध झालेल्या या तिरंगा रॅलीने संपूर्ण रायगड आणि नवी मुंबईचे लक्ष वेधून घेतले.

# लाडक्या सरकारलाही लक्षात ठेवा; खोडा घालणाऱ्यांना जोडा दाखवा –मुख्यमंत्री

बदलापूर – राज्यातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महायुती सरकार मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राबवित आहे. मात्र विरोधकांनी या योजनेची नाहक बदनामी करण्याचा प्रयत्न केला. मात्र एकनाथ शिंदे हा शब्द पाळणारा भाऊ आहे विरोधकांसारखा सावत्र भाऊ नाही. विरोधकांनी खोडा घालण्याचा प्रयत्न करूनही आम्ही योजना यशस्वीपणे राबवून लाडक्या बहिणींच्या खात्यात पैसे जमा केले. त्यामुळे आता महिलांना देखील आपलं लाडकं सरकार लक्षात ठेवा, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्व महिलांना आणि नागरिकांना केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या हस्ते गुरुवारी कुळगाव – बदलापूर नगरपरिषदेच्या प्रशस्त अशा नव्या प्रशासकीय इमारतीचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री शिंदे बोलत होते. देशाचा विकास हा गतीने होत असून विकासाची पहाट दाखवणारा स्वातंत्र्य दिन आज आपण पाहत आहोत. भारताचा विकास महाराष्ट्राच्या उल्लेखाशिवाय पूर्ण होत नाही. आपला महाराष्ट्र सर्व क्षेत्रात पुढे आहे कारण आपल्या सरकारने विकासाला प्राधान्य दिले आहे. येणाऱ्या काळातही अधिक गतीने विकासासाठी आपले सरकार काम करणार असल्याचे मत यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केले. महायुती सरकार राज्यातील जनतेसाठी अनेक कल्याणकारी योजना राबवित आहे. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी लाडकी बहीण योजना राबवत असून या योजनेतील लाभार्थी महिलांच्या खात्यात पैसे जमा होण्यास सुरुवात झाली आहे. या योजनेअंतर्गत बुधवारी ३३ लाख लाभार्थी महिलांच्या खात्यात पैसे जमा झाले तर गुरुवारी ८० लाख महिलांच्या खात्यात पैसे जमा करण्याची प्रक्रिया राबविण्यात आली. विरोधकांनी अपप्रचार केला की जमा झालेले पैसे काढून टाकण्यात येतील. मात्र आमची देना बँक आहे लेना बँक नाही असा टोला लगावत या आधीचे सरकार हे हफ्ते वसुली करणारे सरकार होते मात्र आमचे सरकार हे गरजूंच्या खात्यात हफ्ते भरणारे सरकार आहे अशी टीका देखील केली. तर लाडकी बहीण योजना ही कधीही बंद पडणार नाही त्यामुळे विरोधकांच्या बोलण्यावर विश्वास ठेऊ नका असेही मुख्यमंत्र्यानी सांगितले.



### खोडा घालणाऱ्यांना जोडा दाखवा

"लाडकी बहीण योजनेत महिलांना पैसे मिळू नये म्हणून विरोधकांनी योजनेची बदनामी करत त्यात खोडा घालण्याचा प्रयत्न केला. मात्र आम्ही प्रामाणिक प्रयत्न करून महिलांच्या खात्यात पैसे जमा केले. त्यामुळे आता विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर हेच खोडा घालणारे विरोधक तुमच्या दारी येतील तेव्हा त्यांना जोडा दाखवा. तर कोट्यवधी रुपयांमध्ये लोळणाऱ्या विरोधकांना दीड हजार रुपयांचे मोल नाही कळणार, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले.








■ विकसित भारताचा ७८ वा स्वातंत्र्यदिन साजरा करण्यासाठी शिवसेना चंदनवाडी शाखा, अल्मेडा रोड, ठाणे (प.) या ठिकाणी क्रांतीची मशाल हाती घेऊन थोर क्रांतिकारकांना वंदन करून आपल्या देशाचे जवान कॅप्टन शंकर कुमार यांच्या शुभ हस्ते मध्यरात्री गुरूवर्य धर्मवीर आनंद दिघे यांच्या संकल्पनेनुसार राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली. याप्रसंगी देशाचं रक्षण करणारे आपल्या सैनिकांचा, वीरपत्नींचा सन्मान व सत्कार करण्यात आला. या निमित्ताने ठाणे जिल्हा संघटिका रेखा ताई खोपकर, जिल्हाप्रमुख विठ्ठल जी मोरे , व्दारकानाथ भोईर, ठाणे जिल्हा संपर्कप्रमुख नरेशजी मणेरा, केदार दिघे, मीरा भाईंदर चे जिल्हाप्रमुख प्रभाकर जी म्हात्रे, धर्मराज्य पक्ष प्रमुखराजन राजे, सचिव सूरज मोहिते, सह सचिव शिवाजी निकम असे शिवसेनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. (छाया – मनोज सिंह)



## नवी मुंबई महानगरपालिका

**शहर अभियंता विभाग**

**निविदा सुचना क्र./श.अ/का.अ.(ऐरोली)/73/2024-25**

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम (रू.) |
|---|---|---|
| 1 | ऐरोली सेक्टर 14 येथील होल्डींग पॉंडला एफ.आर.पी. फ्लॅप गेट पुरविणे व सुधारणा करणे. | ₹.6,93,012/- |
| 2 | ऐरोली विभागातील सेक्टर 3 येथील स्व. आनंद दिघे मैदानाची दुरुस्ती व सुधारणा करणे. | ₹.6,72,287/- |
| 3 | ऐरोली सेक्टर 19 येथील होल्डींग पॉंडला एफ.आर.पी. फ्लॅप गेट पुरविणे व सुधारणा करणे. | ₹.6,84,856/- |
| 4 | ऐरोली विभागातील से.9 दिवागात येथील विठ्ठल मंदिर लगत गटर व पदपथाची सुधारणा करणे. | ₹.8,01,997/- |
| 5 | ऐरोली विभागातील होल्डींग पॉड व नाल्या लगतच्या परिसरातील अडथळे काढुन साफसफाई करणे. | ₹.9,74,082/- |

**निविदा पुस्तिका ई-टेंडरिंग (E-tendering) संगणक प्रणालीच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.16/08/2024 रोजी प्राप्त होतील. फेर-निविदेचे सादरीकरण https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Online करण्याचेआहे. ई-निविदा (E-tendering) प्रक्रियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणींसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबर वर संपर्क करावे.**

**कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकरण्याचा अधिकार मा. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.**

सही/-
**(मदन ग. वाघचौडे)**
**कार्यकारी अभियंता (ऐरोली)**
**जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/214/2024** **नवी मुंबई महानगरपालिका**

## ठाणे महानगरपालिका, ठाणे

पाणी पुरवठा विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका, पाणी पुरवठा विभागा मार्फत कोपरी येथील सिध्दार्थनगर परिसरातील बी एस यु पी वसाहतीमधील ०५ इमारतीच्या पाण्याचा दाब वाढविणेकरीता नव्याने ४ इंच व्यासाची जलवाहिनी टाकणे या कामाकरीता ऑनलाईन पध्दतीने ई निविदा मागविण्यात येत आहेत. ज्या कंत्राटदाराविरुध्द शासकीय / निमशासकीय / सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था इ. यांनी शिस्तभंगाचे कार्यवाहीच्या अनुषंगाने नोंदणी पत्र रद्द करण्याची कार्यवाही केली / सुरु आहे, अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रीयेत भाग घेता येणार नाही. निविदा सूचना ठाणे महापालिकेचे संकेस्थळ www.mahatenders.gov.in वर दि. १६/ ०८/ २०२४ ते २३/०८/२०२४ पर्यंत उपलब्ध आहेत. ऑनलाईन निविदा महापालिकेचे संकेतस्थळ येथे दि.२३/०८/२०२४ रोजी सांयकाळी १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. सदर निविदा दि.२६/०८/२०२४ रोजी सांयकाळी १६.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/पा.पु-नौ.को./ २८४/ २०२४-२५ **सही**/-
दि:१४.०८.२०२४ कार्यकारी अभियंता
*plsvisitourofficialweb-site* ठाणे महानगरपालिका,ठाणे
*www.thanecity.gov.in*

## ठाणे महानगरपालिका, ठाणे

**सा.बां. विभाग**
**निविदा सुचना**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील, नौपाडा-कोपरी प्रभाग समिती, सार्व.बांधकाम विभागामार्फत "रस्ते दुरूस्ती" या लेखाशिर्षका अंतर्गत **सर्वकष स्वच्छता मोहिम (Deep Cleaning Campaign) अंतर्गत नौपाडा-कोपरी प्रभाग समिती क्षेत्रातील रस्त्यावरील राडा रोडाची विल्हेवाट करणे या १** कामाकरीता नोंदणीकृत ठेकेदारांकडून ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहे. ज्या निविदाकारांवर शासकीय,निमशासकीय, सार्व.उपक्रम,स्थानिक संस्था महानगरपालिका ई-मार्फत नोंदणी रद्द करणेबाबत/काळ्या यादीत टाकणेबाबत कार्यवाही करणेत आली आहे अथवा प्रस्तावित आहे, अशा निविदाकारांना निविदा भरता येणार नाही. निविदा सुचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in वर दि.१६/०८/२०२४ ते दि.२३/ ०८/२०२४ पर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा महापालिकेचे संकेतस्थळ येथे दि.२३/०८/२०२४ रोजी दुपारी १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. प्राप्त निविदा दि.२६/०८/२०२४ रोजी स. ११.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-नौ.को/ २८५/ २०२४-२५ **सही**/-
दि:१४.०८.२०२४ कार्यकारी अभियंता
*plsvisitourofficialweb-site* ठाणे महानगरपालिका,ठाणे
*www.thanecity.gov.in*



## कुळगाव बदलापूर नगर परिषद इमारतीचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते लोकार्पण

**(पान १ वरून)** करतात, आंदोलन करतात, कारण मुख्यमंत्री देणारा आहे. लोकांचा विश्वास आहे. देशामध्ये सर्वात जास्त पायाभूत सुविधा आपल्या महाराष्ट्रात आहेत. आपला परदेशी गुंतवणूकीमध्ये आपला पहिला नंबर आहे. शेतकरी आपला अन्नदाता आहे. त्याला मदत करताना आपण आपला हात आखडता घेतला नाही. हे सरकार शेतकरी बांधवाच्या पाठीशी उभा आहे.

आम्ही सांगितले होते की, देशातील हे पहिले राज्य आहे. तरुणांना प्रशिक्षण पण देत आहे आणि पैसे पण देत आहे. आपल्या राज्यात उद्योग येत आहेत. त्यांना मनुष्यबळ आपण त्यांना देत आहोत. मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजेनमधून ५४७ लोकांना ठाणे महानगरपालिकेने तरुणांना नियुक्तीपत्र दिले आहेत.तसेच आपणही कुळगाव बदलापूर नगरपरिषदेमध्ये स्थानिक तरुणांना रोजगार द्या. आपण उच्च शिक्षणासाठी मुलींना मोफत शिक्षण दिले आहे. मुलींना यापुढे कोणतेही शिक्षणासाठी पैसे भरावे लागणार नाहीत. शेतकऱ्यांना मोफत वीज योजना सुरु केली आहे. जेष्ठांना मुख्यमंत्री तीर्थ योजना सुरु करण्यात आली आहे. या योजना सर्व चालू राहणार आहेत. अफवांवर विश्वास ठेवू नका. जे आपणास आवश्यक आहे, ते आपणास देण्यात येईल, असेही यावेळी शिंदे यांनी सांगितले.

## मुंब्र्यातील तिरंगा मिरवणुकीत टिपू सुलतानचे पोस्टर, स्वातंत्र्यदिनानिमित्त एसडीपीआयने काढली होती मिरवणूक

**(पान १ वरून)** दिनानिमित्त निघालेली तिरंगा मिरवणूक सर्वत्र चर्चेचा विषय बनली आहे. सोशल डेमोक्रेटिक पार्टी ऑफ इंडिया (एसडीपीआय) या संघटनेने स्वातंत्र्य दिनानिमित्ताने तिरंगा मिरवणूक काढली होती. मुंब्रा रेल्वे स्थानक ते कौसा अशी ही मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत नागरिक मोठ्या संख्येने सामील झाले होते. या मिरवणुकीत दुचाकीस्वाराच्या पाठीमागे बसलेल्या व्यक्तींच्या हातात तिरंगा झेंडे आणि अनेक महापुरुषांचे पोस्टर होते. यामध्ये टिपू सुलतानच्या पोस्टरचाही समावेश होता.

दुचाकीस्वार मोठ्या संख्येने मिरवणुकीत सामील झाले होते आणि या मिरवणुकीमुळे रस्ते वाहतुकीस अडथळा निर्माण होत होता. यावरून वाहतूक पोलीस आणि आयोजकांमध्ये वाद झाला. परंतु काही वेळातच पोलिसांनी आयोजकांची समजूत काढून मिरवणुकीला पुढे सोडले.

## वसई विरार शहर महानगरपालिका कार्यालयांमध्ये स्वातंत्र्य दिन साजरा

**(पान १ वरून)** थेट लाभ हस्तांतरण सक्षम बँक खात्यात दरमहा रु. १५००/- इतकी रक्कम दिली जाईल. महानगरपालिकेकडून या योजनेचे १ लाख १४ हजारांपेक्षा जास्त लाभार्थी महिलांचे अर्ज ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने भरून घेण्यात आले आहेत. या योजनेचा लाभ लाभार्थींच्या दिलेल्या बँक खात्यात जमा होणेसाठी बँक खाते हे आधार सीडिंग असणे आवश्यक आहे. परंतु बऱ्याचशा लाभार्थ्यांचे बँक खाते आधार सीडिंग नसल्याने, त्यांना लाभ देण्यास अडचणी येत आहेत. तरी सर्व पात्र महिलांना आवाहन करण्यात येत आहे कि, त्यांनी लवकरात लवकर त्यांचे बँक खाते आधार सीडिंग करून घ्यावे व याबाबत कोणतीही समस्या आल्यास महानगरपालिका कार्यालयाशी संपर्क करावा, असे आवाहन आयुक्त यांनी यावेळी केले.

तसेच राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामांचे प्रशिक्षण, त्यांची नोकरी मिळण्याची क्षमता वाढविण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना महाराष्ट्र शासनाने सुरु केलेली आहे. प्रशिक्षणार्थ्यांना १२ वी पास असल्यास ६००० रु., आयटीआय/पदविका असल्यास ८००० रु. आणि पदवीधर/पदव्युत्तर यांना १०००० रु. प्रतिमाह विद्यावेतन दिले जाणार आहे. वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत सदर सेवा उपलब्ध करण्यात आली असून आतापर्यंत १७० युवकांनी यात सहभाग नोंदविला आहे. तरी जास्तीत जास्त युवकांनी यात सहभाग नोंदवून या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन आयुक्त यांनी यावेळी युवक वर्गाला केले.

यावेळी महानगरपालिका मुख्यालयाच्या प्रवेशद्वाराच्या ठिकाणी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, नरवीर चिमाजी अप्पा यांच्या तैलचित्रांचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर वसई विरार शहर महानगरपालिका पत्रकार कक्षाचे उद्घाटन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच केंद्र शासनाच्या राष्ट्रीय स्वच्छ हवा गुणवत्ता कार्यक्रम (NCAP) अंतर्गत महानगरपालिकेला ५७ ई-बसेस प्राप्त होत असून त्यापैकी आज १० ई-बसेसचे लोकार्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

तसेच शासन निर्देशानुसार आयुष्मान आरोग्य मंदिर व हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना कार्यान्वित करण्याच्या दिलेल्या उद्दिष्टानुसार आज ०८ आयुष्यमान आरोग्य मंदिर व ०३ हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना चे लोकार्पणही आज महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभाग व प्रभाग समिती कार्यालयांतर्गत तेथील उपस्थित मान्यवरांच्या हस्ते त्या-त्या ठिकाणी करण्यात आले.

महानगरपालिका मुख्यालयात झालेल्या ध्वजारोहण कार्यक्रमास आमदार हितेंद्र ठाकूर, आमदार क्षितीज ठाकूर, प्रथम महापौर राजीव पाटील, माजी सभापती, माजी नगरसेवक व नगरसेविका, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, पोलीस विभागातील कर्मचारी, शिक्षक व विद्यार्थी, पत्रकार, महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी, नागरिक व इतर मान्यवर उपस्थित होते.

## प्रशासन लोकसेवेसाठी कटिबध्द –जिल्हाधिकारी

**(पान १ वरून)** उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व अजित दादा पवार यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासन अहोरात्र काम करीत आहे. शासन सर्वसामान्यांसाठी तसेच गरजू घटकांसाठी विविध महत्वाकांक्षी योजना राबवित आहे, मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजना या योजनेच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणांतर्गत गरजू महिला भगिनींना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यात येत आहे, असे सांगून त्यांनी मुख्यमंत्री- अन्नपूर्णा योजना, मुख्यमंत्री- युवा कार्य प्रशिक्षण योजना, मुख्यमंत्री- तीर्थ दर्शन योजना, मुख्यमंत्री- वयोश्री योजना, मुख्यमंत्री-बळीराजा वीज सवलत योजना, मुलींसाठी मोफत उच्च शिक्षण योजना, या योजनांचीही माहिती देवून जास्तीत जास्त नागरिकांनी या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. ते म्हणाले, शासन व प्रशासन मिळून ठाणे जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासावरही भर देत आहे. जिल्ह्यातील पायाभूत सुविधा, रस्त्यांचा विकास, शेती क्षेत्र अशा विविध पातळ्यांवर कामे वेगाने सुरु आहेत. मुंबईच्या शेजारी असलेला ठाणे जिल्हा हा महत्त्वाचा जिल्हा आहे. ठाणे जिल्ह्याचे नागरीकरण झपाट्याने होत असून त्याबरोबरच मुरबाड, शहापूर सारखा आदिवासी भागाचा विकासाकडेही लक्ष देणे आवश्यक ठरते. त्यादृष्टीनेही विकासाचे नियोजन करण्यात येत आहे.

मुख्यमंत्री माननीय एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून ठाणे महापालिकेतर्फे आशिया खंडातील सर्वात मोठी समूह पुनर्विकास म्हणजेच क्लस्टर योजना राबविण्यात येत आहे. ठाणे महापालिका क्षेत्रात अस्तित्वातील धोकादायक अनधिकृत, अधिकृत इमारतींचा; तसेच झोपडपट्टीचा नियोजित विकास करण्याचा महत्वाकांक्षी उपक्रम समूह विकास योजनेंतर्गत राबविण्यात येत आहे, याविषयी बोलताना जिल्हाधिकारी म्हणाले, या उपक्रमांतर्गत एकूण १ हजार ६५० हेक्टर क्षेत्र अधिसूचित करण्यात आले आहे. त्यापैकी कोपरी, राबोडी, टेकडी बंगला, हाजुरी, किसननगर, लोकमान्यनगर असे अंदाजित एकूण ३५७.१३ हेक्टर इतके क्षेत्र अंमलबजावणीसाठी प्रथम टप्प्यात प्राधान्याने देण्यात आले आहे. सिडको आणि महाप्रित या दोन संस्थांसोबत ठाणे महापालिकेने सामंजस्य करार केला आहे. सिडकोमार्फत एकूण २९ हजार १८६ इतक्या पुनर्वसन सदनिकांची तर, महाप्रित संस्थेकडून एकूण १४ हजार ७१ इतक्या पुनर्वसन सदनिकांची निर्मिती करण्यात येणार आहे. या योजनेचे किसननगर येथील बांधकाम प्रगतीपथावर आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात जागतिक पर्यावरणदिनानिमित्त मुख्यमंत्री हरित ठाणे अभियान हाती घेण्यात आले होते. या अभियानाच्या माध्यमातून १५ ऑगस्टपर्यंत एक लाख झाडे लावण्याचा संकल्प पूर्ण करण्यात आला आहे, याबद्दल कौतुकोद्गार काढून श्री.शिनगारे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण राज्यात बांबू लागवडीस आणि स्थानिक प्रजातींच्या झाडांच्या लागवडीस प्राधान्य व प्रोत्साहनही दिले जात आहे. बांबूचे पर्यावरणीय महत्व लक्षात घेता ज्या क्षेत्रात बांबू लागवड शक्य आहे त्या त्या क्षेत्रात बांबू लागवड करावी, असे सर्वांना आवाहन केले.

महसूल सप्ताहविषयी बोलताना ते म्हणाले, राज्य शासनाने गेल्या वर्षीपासून राबविण्यास सुरुवात केली आहे. यावर्षीही ठाणे जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये महसूल सप्ताहनिमित्त युवा संवाद, जनसंवाद, माजी सैनिकांसाठी कार्यक्रम, एक हात मदतीचा दिव्यांगाच्या कल्याणाचा असे विविध लोकोपयोगी लोकाभिमुख उपक्रम राबविण्यात आले. ठाणे जिल्हा प्रशासनाने महसूल सप्ताह अंतर्गत अतिशय चांगले कार्य केले आहे. यापुढेही जिल्हा प्रशासनाकडून गरजू नागरिकांना जास्तीत जास्त योजनांचा लाभ देण्यासाठी प्रयत्न सुरुच राहतील. संपूर्ण प्रशासन लोकसेवेसाठी कटिबध्द आहे.

शेवटी आपण भारत देशाच्या ७८ व्या स्वातंत्र्यदिनाचा हा सोहळा अभिमानाने मोठ्या उत्साहात साजरा करीत आहोत. आपल्या देशाचा वारसांचा गौरव करून देशाची एकात्मता बलशाली करण्याचा व देशाचे संरक्षण करणाऱ्यांप्रति सन्मान बाळगण्याचा संकल्प करूया. आपल्या भारत देशाला आत्मनिर्भर व विकसित बनविण्यासाठी हातभार लावू या, असे आवाहन करुन पुन:श्च एकदा जिल्हाधिकाऱ्यांनी सर्वांना भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या. या मुख्य ध्वजारोहण सोहळ्यानंतर जिल्हा नियोजन सभागृहात विविध प्रशासकीय, शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या उत्कृष्ट अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देवून गौरविण्यात आले.

## कसा स्वातंत्र्यदिन विद्यार्थ्यांनी साजरा करायचा ?– आव्हाड

**(पान १ वरून)** काही ठिकाणी एकाच गटाला तालुक्यातील सर्व विद्यार्थ्यांचे गणवेश शिवण्याचे कंत्राट देण्यात आल्याने काम रखडले आहे. गणवेशाअभावी राज्यातील हजारो विद्यार्थ्यांना साध्या कपड्यांमध्येच ध्वजवंदनाला जावे लागणार असल्याचे स्पष्ट आहे. काही शाळांमध्ये गणवेश मिळाले असले तरी मळखाऊ रंग, कापडाचा दर्जा याबाबत पालक आणि शिक्षकांनी नाराजी व्यक्त केली आहे. गणवेशाच्या मापातही गोंधळ आहेत. त्यामुळे आलेले गणवेश विद्यार्थ्यांना व्हावेत, यासाठी दुरुस्ती करावी लागणार असल्याची तक्रार आहे.

यावरून जितेंद्र आव्हाड म्हणाले, राज्यातील तब्बल २० जिल्ह्यांत एकही शालेय गणवेश पोहचला नाही, झेंडावंदनला नवीन कपडे सुद्धा हे सरकार शालेय मुलांना देऊ शकले नाही, किती दुर्भाग्य आपले ? कसा स्वातंत्र्यदिन त्यांनी साजरा करायचा? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

सोमवारी सायंकाळपर्यंत गणवेश मिळाले नसल्याचे जळगाव, लातूर, पालघर, सोलापूर, नागपूर, हिंगोली, पुणे, नगर, नाशिक, रायगड या जिल्ह्यांतील शिक्षकांनी सांगितले.

दैनिक महाराष्ट्र सम्राट
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !
संपादक : गणेश चंद्रकांत भोईटे



# कल्याण-डोंबिवली पालिकेतर्फे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

कल्याण : कल्याण-डोंबिवली महानगरपालिका मुख्यालयात आज ७८ वा भारतीय स्वातंत्र्य दिन समारोह आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड यांचे शुभहस्ते ध्वजारोहणाने संपन्न झाला. यावेळी माजी पालिका सदस्य मोहन उगले, सुधीर बासरे, इतर पालिका सदस्य, महापालिकेतील अधिकारी व कर्मचारी वर्ग बहुसंख्येने उपस्थित होता.यावेळी राष्ट्रगीतानंतर राज्य गीताची ध्वनिफीत वाजविण्यात आली. तद्नंतर हुतात्मा स्मारकास वंदन करून घरोघरी तिरंगा या अभियानांतर्गत आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड यांचेसह सर्व उपस्थितांनी तिरंगा प्रतिज्ञा घेतली ,यावेळी महात्मा फुले, मनपा शाळा क्र.६८, कल्याण या शाळेच्या विद्यार्थ्यांनी गायलेल्या देशभक्तीपर



समूह गीताने सर्व वातावरण देशभक्तीने भारून गेले. उपस्थित विद्यार्थी वर्गास हिंदू यंग वर्ल्ड या वृत्तपत्राचे वितरण करण्यात आले. तसेच कु.तन्वी कौस्तुभ घारपुरे या विद्यार्थिनीचा बॅडमिंटनमध्ये राज्यस्तरावर नेत्रदीपक कामगिरी बजावल्याबद्दल सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे

महापालिकेच्या डोंबिवली विभागीय कार्यालयात महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांचे शुभहस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. तद्नंतर डोंबिवली येथील वै.ह.भ.प. सावळाराम महाराज म्हात्रे क्रिडा संकुलातील कॅ. विनयकुमार सचान स्मारकास महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड यांनी पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले. यावेळी कॅप्टन विनयकुमार सच्चान यांचे माता पिता, पद्मश्री पुरस्कार विजेते गजानन माने, अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड तसेच महापालिकेचे इतर अधिकारी,कर्मचारी उपस्थित होते.

तदनंतर डोंबिवली पूर्वेतील दत्तनगर चौक येथील दीडशे फुटी उंच ध्वजाचे ध्वजारोहण महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड यांच्या हस्ते करण्यात आले. १९४७ साली भारताला मिळालेल्या स्वातंत्र्य लढ्यात हौतात्म्य प्राप्त झालेल्या, देशासाठी प्राणपणाने लढलेल्या शहीदांचे, स्वातंत्र्यवीरांचे कृतज्ञतेने स्मरण करण्याचा हा दिवस आहे असे सांगत आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड यांनी स्वातंत्र्यदिनानिमित्त उपस्थित असलेल्या मान्यवरांना तसेच नागरिकांना शुभेच्छा दिल्या. यावेळी डोंबिवली शिवसेना शहरप्रमुख राजेश मोरे, इतर पदाधिकारी महापालिका अधिकारी,वरिष्ठ पोलीस अधिकारी, नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

डॉ. राजेश मढवी फाऊंडेशनच्या वतीने ७८ व्या स्वातंत्र्यदिनी

## तिरंग्याला आरोग्यसेवा, मानवसेवा, सामाजिक सेवेची सलामी







नौपाडा : कोपरी रस्त्यावरील नरवीर तानाजी चौकात भाजपा ठाणे शहर व डॉ. राजेश मढवी फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने ७८ स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून भव्य असे आरोग्य शिबीर, अवयव दान नोंदणी उपक्रम तसेच आयुष्यमान भारत, नव मतदार नोंदणी शिबिर असा भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या मध्ये अंबर आय केअर यांच्या सौजन्याने मोफत नेत्र तपासणी, सवलतीच्या दरात चश्मा वाटप तसेच सवलतीच्या दरात मोतीबिंदू व इतर शस्त्रक्रियांचे शिबिर संपन्न झाले. त्याचबरोबर जेनेरिक कार्ड संस्थेतर्फे जेनेरिक औषधांचा स्टॉल व प्रवा मेडिकलतर्फे डायबिटीस तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. आणि दत्ता मेघे कॉलेज एन एस एस ग्रुप तर्फे अवयव दान नोंदणी उपक्रम व कॅन्सर, एड्स सारख्या आजारांवर पथनाट्य द्वारे जनजागृती करण्यात आली. यासोबत पंतप्रधान मोदींची महत्त्वाकांक्षी आयुष्यमान भारत योजनांचे शिबिर व मतदान नोंदणी शिबिरही आयोजित करण्यातआले होते, आजच्या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध हृदयरोगतज्ञ डॉ. अनिल तांबे यांच्या शुभहस्ते झेंडावंदन कार्यक्रम संपन्न झाला. त्याचबरोबर आरोग्य शिबिराचे उद्घाटन ठाण्याचे आमदार संजय केळकर, आमदार निरंजन डावखरे, यांच्या शुभहस्ते करण्यात आले. सदर कार्यक्रमास ठाणे शहर अध्यक्ष संजय वाघुले, मा. अध्यक्ष संदीप लेले, प्रदेश महामंत्री माधवी नाईक, सुजय पतकी, हाउसिंग फेडरेशन सिताराम राणे, परिवहन सदस्य विकास पाटील, मा. नगरसेवक सुनेश जोशी, मृणाल पेंडसे, दीपक जाधव, विलास साठे, ड. सुभाष काळे आदी मान्यवर उपस्थित होते. आजच्या शिबिरास अंदाजे ५०० च्या वर लाभार्थ्यांनी उपक्रमाचा लाभ घेतला. उपस्थित सर्वांचे आयोजक मा. नगरसेविका प्रतिभा राजेश मढवी व ठाणे भाजपा उपाध्यक्ष डॉ. राजेश मढवी यांनी आभार मानले.



भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेत मुख्यालयात प्रशासक तथा आयुक्त अजय वैद्य यांच्या हस्ते झेंडावंदनाचा मुख्य कार्यक्रम पार पडला. यावेळी पालिका अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त मुख्यालय नयना ससाणे, उपायुक्त समाज कल्याण डॉ. अनुराधा बाबर, मुख्य लेखा परीक्षक मयूर हिंगाणे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी अधिकारी किरण तायडे, प्रभारी शहर अभियंता सचिन नाईक, पाणीपुरवठा कार्यकारी अभियंता संदीप पटनावर, या अधिकाऱ्यांसह, सर्व प्रभाग अधिकारी, सर्व विभाग प्रमुख , माजी नगरसेवक सिद्धेश्वर कामुर्ती, प्रशांत लाड, अरुण राऊत यांच्यासह अन्य अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळेला पालिका अग्निशमन विभाग कर्मचारी आणि सुरक्षा जवान यांनी ध्वजवंदनास मानवंदना दिली. मुख्यालयातील झेंडा वंदनानंतर आवारातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा, हुतात्मा स्मारक व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

स्वातंत्र्यदिनानिमित्ताने

# पनवेल पालिकेत ध्वजारोहण उत्साहात

पनवेल : भारताच्या ७८ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त पनवेल पालिकेच्यावतीने छत्रपती संभाजी महाराज मैदानावर आज (१५ ऑगस्ट) आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या शुभ हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी अतिरीक्त आयुक्त भारत राठोड, उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त बाबासाहेब राजळे, उपायुक्त डॉ.वैभव विधाते,सहाय्यक संचालक रचनाकार ज्योती कवाडे, मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, विरोधी पक्षनेते, माजी नगरसेवक व नगरसेविका,शहर अभियंता संजय कटेकर, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण पालिका अधिकारी, सर्व विभाग प्रमुख,उपस्थित होते.





यावेळी रायगड सुरक्षा रक्षक मंडळ, महाराष्ट्र राज्य सुरक्षा बल,पालिकेचे अग्निशमन दलाच्या जवानांनी संचलन केले तसेच ध्वजाला मानवंदना दिली. शिक्षण विभागाच्यावतीने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करण्यात आले. यावेळी महापालिका कर्मचारी, जेष्ठ नागरिक, नागरिक, पत्रकार उपस्थित होते.

भारतीय नागरिकांमध्ये राष्ट्राबद्दल प्रेम,आदर वाढवावा, एकतेची भावना निर्माण व्हावी या उद्देशाने गेल्या आठवड्यापासून महापालिका क्षेत्रात 'घरोघरी तिरंगा' अभियान मोठ्या उत्साहात राबविण्यात आले. यामध्ये महापालिकेच्यावतीने दिनांक ०९ क्रांती दिनाच्या निमित्ताने तिरंगा प्रतिज्ञा, तिरंगा कॅनव्हास, तिरंगा ट्रिब्यूट कार्यक्रम पनवेलमधील हुतात्मा स्मारक उद्यानामध्ये घेण्यात आला. शाळेतील विद्यार्थी, विविध संस्था, तरुण मंडळे, नागरिक यांच्या सहकार्याने तिरंगा सन्मानार्थ हातामध्ये तिरंगा घेवून तिरंगा यात्रा , तिरंगा मॅरेथॉन दौड काढण्यात आली. याबरोबरच चारही प्रभागांमध्ये बाईक व सायकल रॅली काढण्यात आली. ओरीयन मॉल येथे फ्लॅश मॉबचा कार्यक्रम घेण्यात आला. तिरंगा सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत देशभक्तिपर गीतांचा कार्यक्रम महानगरपालिकेच्यावतीने आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आयोजित आला होता. 'तिरंगा मेला' अंतर्गत तिरंगा संदर्भातील विविध स्टॉल, तिरंगा झेंडे, तिरंगा बिल्ले, तिरंगी कपडे इत्यादींचे बचतगटामार्फत स्टॉल्स उभारण्यात आले होते. तसेच प्रभाग कार्यालयाच्यावतीने शाळा, विविध आस्थापना ,नागरिक यांना झेंड्यांचे वितरण करण्यात आले.

महापालिका मुख्यालयाबरोबर महापालिकेच्या दहा शाळांमध्ये देखील स्वातंत्र्यदिनानिमित्ताने ध्वजारोहणाचा कार्यक्रम करण्यात आला. यावेळी ढोल ताशाच्या तालावर विद्यार्थ्यांनी लेझीमचा फेर धरला. तसेच कोळीवाडा शाळेच्यावतीने वंदे मातरम, भारत माता की जयच्या घोषणा देत विद्यार्थ्यांची रॅली काढण्यात आली.

### हुतात्मा स्मारक येथे ध्वजवंदन

स्वातंत्र्यदिनानिमित्ताने हुतात्मा स्मारक येथे थोर स्वातंत्र्य सैनिकांचे उत्तराधिकारी यतीन ठाकूर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त भारत राठोड , उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त बाबासाहेब राजळे, सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, तहसीलदार विजय पाटील, पालिकेचे माजी विरोधीपक्ष नेते प्रितम म्हात्रे, महापालिका अधिकारी-कर्मचारी, स्वातंत्र्य सैनिकांचे उत्तराधिकारी, जेष्ठ नागरिक उपस्थित होते.

## राष्ट्र उभारणीसाठी भांडवली बाजारपेठेचा विकास सुरूच ठेवणार: चौहान

पनवेल : नॅशनल स्टॉक एक्सचेंज अर्थात एनएसई यापुढेही गुंतवणूकदार जागरूकता व संरक्षणासाठी, त्याचबरोबर राष्ट्र उभारणीसाठी भांडवली बाजारपेठेचा विकास सुरूच ठेवणार आहे, असा विश्वास एनएसईचे व्यवस्थापकीय संचालक व सीईओ आशिषकुमार चौहान यांनी दिला. भारताच्या ७८ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त त्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना, प्रगतिशील आणि समृद्ध देशाचे स्वप्न पूर्ण करत असताना आपल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या त्यागाचा कायम सन्मान करूया, असे म्हंटले. भारतातील संपत्ती निर्मितीचे उत्प्रेरक आणि आघाडीचे रेग्युलेटर या नात्याने आम्ही अधिक बळकट आणि सर्वसमावेशक राष्ट्र उभारणीसाठी बांधील आहोत. एनएसई यापुढेही गुंतवणूकदार जागरूकता व संरक्षणासाठी, तसेच राष्ट्र उभारणीसाठी सातत्यपूर्ण प्रयत्नातून भांडवली बाजारपेठेचा विकास सुरूच ठेवणार आहे आणि त्यानुसार कार्य करणार आहे, असे त्यांनी अधोरेखित करून सर्व देशवासियांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

## प्लास्टिकमुक्त शहरासाठी स्वातंत्र्यदिनी संकल्प करण्याचे आयुक्त डॉ. कैलाश शिंदे यांचे आवाहन

नवी मुंबई : स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणशील शहर अशी नवी मुंबईची ओळख असून त्यादृष्टीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांमध्ये नागरिकांचा उत्तम सहभाग मिळत असून हाच उत्साह कायम राखत प्लास्टिकमुक्त मार्केट, प्लास्टिकमुक्त सोसायटी, प्लास्टिकमुक्त शाळा करण्याचा संकल्प आजच्या स्वातंत्र्यदिनानिमित्त करून निसर्गाची आणि पर्यावरणाची हानी करणाऱ्या एकल वापर प्लास्टिकला दैनंदिन जीवनातून दूर करूया असे आवाहन नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी केले.



'घरोघरी तिरंगा' अभियानांतर्गत भारताच्या ७८ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त मुख्यालयातील ॲम्फिथिएटरमध्ये आयोजित विशेष समारंभप्रसंगी आयुक्तांच्या हस्ते तिरंगा ट्रिब्युट उपक्रमांतर्गत शहीद जवानांच्या कुटुंबियांचा तसेच १९७१ च्या युध्दात सहभागी झालेल्या माजी सैनिकांचा सन्मान करण्यात आला. यावेळी देशभक्तीपर सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, अतिरिक्त आयुक्त तथा शहर अभियंता शिरीष आरदवाड, प्रशासन विभागाचे उपआयुक्त शरद पवार व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी मनोगतात आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी विभाग कार्यालय स्तरावर स्वच्छतेची निकोप स्पर्धा व्हावी व यातून नवी मुंबई शहर स्वच्छता अधिक प्रभावीपणे व्हावी यादृष्टीने स्वच्छ मंथन स्पर्धेचे पाचवे पर्व सुरू होत असल्याचे सांगितले. तसेच शहर स्वच्छतेकडे अधिक बारकाईने लक्ष देणारी अँटी डेब्रिज व अँटी गार्बेज विशेष पथके आजपासून कार्यान्वित होत असल्याचे जाहीर केले. स्वच्छता मॉनिटरींग प लवकरच कार्यान्वित होत असल्याचेही त्यांनी सांगितले.

शाळांमध्ये राबविण्यात येत असलेल्या 'झिरो प्लास्टिक स्टार्ट विथ मी' या उपक्रमात पहिल्या ३ क्रमांकाची सर्वोत्तम कामगिरी करणारे विद्यार्थी अनुक्रमे तानिया खातुन फरीद मल्लिक (नमुंमपा शाळा क्र. १८ सानपाडा), विघ्नेश नागेश खोत (नमुंमपा शाळा क्र. १० नेरूळ) व सागर देवजी चव्हाण (नमुंमपा शाळा क्र. ११७ दिवाळे) या ३ विद्यार्थ्यांना आयुक्त महोदयांच्या हस्ते गौरविण्यात आले.

याप्रसंगी 'घरोघरी तिरंगा' अभियानांतर्गत आयोजित सांस्कृतिक उपक्रमांत नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. १०१, शिरवणे येथील विद्यार्थी समुहाने देशभक्तीपर दिमाखदार नृत्याविष्कार सादर केला. स्वच्छता दिंडी स्पर्धेतील विजेत्या छत्रपती शाहू महाराज विद्यालय नमुंमपा शाळा क्र. १०४ आंबेडकर नगर, रबाळे यांनी वारकरी परंपरेचे दर्शन घडवितानाच 'निश्चय केला, नंबर पहिला'चा उद्घोष करीत स्वच्छतेचा संदेश प्रसारित केला.



प्रभाग समिती दोनचे कार्यालय जुने मुख्यालयात होते. परंतु सदर इमारत नादुरुस्त झाल्याने सदर इमारतीमध्ये असलेले प्रभाग समिती दोनचे कार्यालय टेमघर पाडा येथील युनियन बँके जवळील, पंडित दीनदयाळ उपाध्याय रात्र निवारा केंद्राच्या तळमजल्यावर, भिवंडी कल्याण मुख्य रस्त्यावर स्थलांतरित करण्यात आले. स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून पालिका आयुक्त अजय वैद्य यांच्या हस्ते या कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी पालिका अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त मुख्यालय नयना ससाणे, उपायुक्त समाज कल्याण डॉ. अनुराधा बाबर, मुख्य लेखा परीक्षक मयूर हिंगाणे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी किरण तायडे, प्रभारी शहर अभियंता सचिन नाईक, पाणीपुरवठा कार्यकारी अभियंता संदीप पटनावर, या प्रभागाचे प्रभाग अधिकारी सुधीर गुरव, सहाय्यक आयुक्त नितीन पाटील, वैद्यकीय अधिकारी डॉ. बुशरा सय्यद, तर मूल्यांकन अधिकारी गिरीश घोष्टेकर, जनसंपर्क अधिकारी मिलिंद पळसुले, प्रभागातील सर्व कर्मचारी उपस्थित होते. यावेळेला पहिल्या मजल्यावरील रात्र निवारण केंद्रातील बेघर नागरिकांना पालिका आयुक्त अजय वैद्य अन्य मान्यवरांच्या हस्ते जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले.



देशाच्या ७८ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त ठाण्यातील शिवसेना ठाणे जिल्हा शाखा येथे मध्यरात्री मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले यावेळी खासदार नरेश म्हस्के, आमदार प्रताप सरनाईक आदिसह कार्यकर्ते उपस्थित होते. (छाया : मनोज सिंह)

नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण संपन्न

# मुख्यालयाच्या तिरंगी रंगातील आकर्षक रोषणाईसोबत नागरिकांमध्ये सेल्फीचे आकर्षण

नवी मुंबई : भारताच्या ७८ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त आयकॉनिक वास्तू म्हणून नावाजल्या जाणा-या नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालय इमारतीच्या प्रांगणात महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, अतिरिक्त आयुक्त तथा शहर अभियंता शिरीष आरदवाड, प्रशासन विभागाचे उपआयुक्त शरद पवार यांच्यासह विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारीवृंद तसेच लोकप्रतिनिधी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पोलीस, अग्निशमन जवान व महाराष्ट्र सुरक्षा बलाचे सुरक्षारक्षक यांच्या पथकांची यावेळी लक्षणीय उपस्थिती होती.

मुख्यालयाच्या अंतर्गत दर्शनी भागात काढलेली आकर्षक रांगोळी आणि 'घरोघरी तिरंगा' अभियानाच्या ठेवलेल्या तिरंगा झेंड्याच्या सेल्फी पॉईंटसोबत अनेक नागरिकांनी छायाचित्रे काढली. तसेच तिरंगा कॅनव्हासवर आपली स्वाक्षरी करून 'घरोघरी तिरंगा' अभियानात आपला सहभाग नोंदविला.

नमुंमपा मुख्यालय इमारतीला १३ तारखेपासून नयनरम्य तिरंगी विद्युत रोषणाई करण्यात आलेली असून यामुळे भव्यतम मुख्यालय इमारतीच्या आकर्षणात भर पडलेली आहे. नागरिक मोठ्या संख्येने मित्र, परिवारासह एकत्र येऊन रात्री तिरंगी झळाळी असलेल्या मुख्यालय वास्तुसोबत उत्साहाने छायाचित्रे काढताना दिसत आहेत. १६ ऑगस्टपर्यंत ही विद्युत रोषणाई बघता येणार आहे.

याशिवाय पावसाळी कालावधीत फडकविला न जाणारा मुख्यालय इमारती समोरील २२५ फूट उंच व भव्यतम स्वरूपातील प्रतिकात्मक राष्ट्रध्वज हा स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून 'घरोघरी तिरंगा' मोहीमेच्या अनुषंगाने फडकविण्यात आला असून हे देखील नागरिकांचे विलक्षण आकर्षण आहे. त्यामुळे नागरिक मोठ्या संख्येने या परिसराला भेट देत राष्ट्रप्रेम जागवित आहेत. एवढेच नव्हे तर या रस्त्याने प्रवास करणारे अनेकजण याठिकाणी थांबून उंच राष्ट्रध्वज व भव्य मुख्यालय इमारत तसेच रात्री तिरंगी रंगात उजळून निघालेल्या मुख्यालयासोबत सेल्फी व छायाचित्रे काढताना दिसत आहेत.





ठाणे पालिकेच्यावतीने स्वातंत्र्य दिन साजरा

# सफाई कर्मचारी गुणवंत कामगार पुरस्काराने सन्मानित



ठाणे : ७८वा भारतीय स्वातंत्र्यदिन ठाणे महानगरपलिकेच्यावतीने मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने महापालिका मुख्यालयाच्या प्रांगणात राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण महापालिका आयुक्त तथा प्रशासक सौरभ राव यांच्या हस्ते करण्यात आले. ठाणे महानगरपालिकेचे सुरक्षा दल, अग्निशामक दल आणि टीडीआरएफ यांच्या जवानांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली.

ध्वजारोहण सोहळ्यास माजी नगरसेवक नारायण पवार, माजी नगरसेवक संदीप लेले, माजी नगरसेवक विकास रेपाळे, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, मुख्य अग्निशमन अधिकारी गिरिश झळके यांच्यासह सर्व वरिष्ठ अधिकारी आणि महापालिकेचे कर्मचारी, गुणवंत कामगारांचे कुटुंबिय उपस्थित होते.



त्यानंतर, ठाणे शहराच्या स्वच्छतेसाठी योगदान देणाऱ्या १० प्रातिनिधिक सफाई कर्मचाऱ्यांचा उल्लेखनीय कामगिरीबद्दल गुणवंत कामगार पुरस्काराने आयुक्त सौरभ राव यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. त्यात, शिल्पा रोहिदास पलांडे, लक्ष्मण महादेव मांढरे, कविता वसंत पाटील, सावित्री अनिल शहा, संदीप रामचंद्र लवांदे, मरूबाई सिद्धार्थ उबाळे, पद्माकर वसंत पाटील, शेखर लक्ष्मण मोरे, संजय मारूती म्हात्रे, उषा ढाकणे या गुणवंत कामगारांचा समावेश आहे. या सत्कारप्रसंगी, उपायुक्त (घनकचरा) तुषार पवार आणि आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे उपस्थित होते.

या प्रसंगी, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त (मुख्यालय) जी. जी. गोदेपुरे, उपायुक्त (माहिती व जनसंपर्क) उमेश बिरारी, उपायुक्त (परिमंडळ २) शंकर पाटोळे, मुख्य अग्निशमन अधिकारी गिरिश झळके उपस्थित होते.



स्वातंत्र्य दिनानिमित्त पनवेल तालुका व शहर भारतीय जनता पार्टीच्या वतीने ध्वजारोहण व ध्वजवंदन समारंभ मोठ्या उत्साहात साजरा झाला. त्या अनुषंगाने तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, चारुशीला घरत, शहर अध्यक्ष अनिल भगत, महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, ज्येष्ठ नेते सी.सी. भगत, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, माजी नगरसेवक तेजस कांडपिळे, अजय बहिरा, माजी नगरसेविका दर्शना भोईर, नीता माळी, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, दशरथ म्हात्रे, अमित ओझे, अमरीश मोकल, महिला मोर्चा शहर अध्यक्षा राजेश्री वावेकर, यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



## 31 ऑगस्टपर्यंत

# सीपी तलाव येथील कचरा उचलला जाईल

## आयुक्त सौरभ राव यांची माहिती

■ ठाणे (गणेश भोईटे)

वागळे इस्टेट सी पी तलाव येथील कचरा जादा मनुष्यबळ, जादा गाड्या यांचा वापर करून वेगाने हा कचरा उचलला जावा असे निर्देश आयुक्त सौरभ राव यांनी सोमवारी दिले होते. त्यानुसार गेल्या तीन दिवसात किती कचरा उचलण्यात आला, तसेच या ठिकाणी सुरू असलेल्या कामाची पाहणी आयुक्त सौरभ राव यांनी आज (१५ ऑगस्ट) केली. सी पी तलाव हा परिसर कचरामुक्त करावा असे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले असून त्यानुसार हा परिसर कचरामुक्त करण्याच्या कामाचे सूक्ष्म नियोजन महापालिकेने केले असून ३१ ऑगस्टपर्यंत या परिसरातील कचरा पूर्णपणे उचलला जाईल त्या दृष्टीने युद्धपातळीवर काम सुरू असल्याचे आयुक्त राव यांनी नमूद केले.

यावेळी अतिरिक्त आयुक्त २ प्रशांत रोडे, उपायुक्त तुषार पवार, शंकर पाटोळे, वैद्यकीय अधिकारी डॉ. राणी शिंदे आदी तसेच स्थानिक माजी नगरसेवक राम रेपाळे, एकनाथ भोईर, गुरूमुखसिंग स्यान, माजी नगरसेविका शिल्पा वाघ, मनिषा कांबळे आदी उपस्थित होते.

### शास्त्रोक्त पध्दतीने कचऱ्यावर प्रक्रिया

सी पी तलाव येथील ट्रान्सफर स्टेशन याचा मुलभूत उद्देश होता की येथे छोट्या वाहनांमधून कचरा येईल आणि तो कचरा कॉम्पॅक्टर आणि डंपरमधून त्याला प्लांटपर्यत घेवून जाईल परंतु येथील प्रोसेसिंग प्लांट पूर्ण क्षमतेने चालू नसल्यामुळे या ठिकाणाला डंपिंग ग्राऊंडचे स्वरुप प्राप्त होवून या ठिकाणी जवळ जवळ ३० हजार मेट्रिक टन कचरा जमा झाला होता, या परिसराला कचरा मुक्त करण्यासाठी महापालिकेने सूक्ष्म नियोजन केले आहे. यासाठी कचरा उचलणाऱ्या वाहनांची संख्या वाढविण्यात आली असून दिवसरात्र सदरचा कचरा हा उचलला जात आहे. सदरचा कचरा हा शासनाकडून आतकोली येथे प्राप्त झालेल्या जागेवर नेला जात आहे, तेथे हा कचरा नुसता टाकला जाणार नसून त्या ठिकाणी शास्त्रोक्त पध्दतीने कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात येणार असून त्या दृष्टीने तेथे काम सुरू असल्याचे आयुक्तांनी यावेळी सांगितले.

कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी अनेक संस्थांनी संपर्क साधला आहे. त्याचप्रमाणे गोवा, पुणे, पिंपरी चिंचवड, मुंबई, वाराणसी या ठिकाणी ज्या पध्दतीने कचऱ्यावर प्रक्रिया केली जाते त्या ठिकाणी मी स्वत: भेटी देवून त्याची पाहणी करुन माहिती घेतली आहे. कचऱ्यावर प्रक्रिया करणाऱ्या ज्या विविध टेक्नॉलॉजी आहेत, त्यापैकी सर्वोत्तम टेक्नॉलॉजीचा वापर ठाण्यातील कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी केला जाईल व ठाणेकरांची या समस्येतून मुक्तता केली जाईल असेही आयुक्त सौरभ राव यांनी यावेळी नमूद केले.

सी पी तलाव येथील कचरा हस्तांतरण केंद्रातील कचरा उचलण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. हे काम सुरू असताना या परिसरात दुर्गंधी पसरू नये, डासांची उत्पत्ती होऊ नये म्हणून मोठ्या प्रमाणावर औषधांची फवारणी करण्यात येत आहे, याचीही पाहणी ही आयुक्त राव यांनी यावेळी केली.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते 'एक पेड माँ के नाम' या अभियानाचा शुभारंभ



ठाणे : राज्यातील सर्व महापालिकांनी एक लाख झाडे लावावीत, असे निर्देश दिले असून त्याप्रमाणे सर्व महापालिका वृक्षारोपण करीत आहेत. पर्यावरणाचे संवर्धन करण्याच्या दृष्टीने वृक्षारोपण करणे, ही भविष्याची गरज असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे केले. 'एक पेड माँ के नाम' या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देऊन प्रत्येकाने आपल्या आईच्या नावे एक झाड लावावे, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी नागरिकांना केले.

यावेळी ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव, खासदार नरेश म्हस्के, आमदार प्रताप सरनाईक, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, उपायुक्त शंकर पाटोळे, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे उपसंचालक उदय ढगे, वरिष्ठ उद्यान अधीक्षक केदार पाटील, ज्येष्ठ माजी नगरसेवक हणमंत जगदाळे, एकनाथ भोईर, दिगंबर ठाकूर, विहंग सरनाईक, माजी नगरसेविका राधाबाई जाधवर, आशा डोंगरे, वनिता घोगरे, प्राजक्ता खाडे, वृक्ष प्राधिकरण समितीचे माजी सदस्य नम्रता भोसले, विक्रांत चंद्रहास तावडे तसेच ग्रीन यात्राचे प्रतिनिधी आदी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त पी.वेलरासू यांच्या हस्ते

# कोंकण भवन येथे ध्वजारोहण संपन्न



नवी मुंबई : भारतीय स्वातंत्र्य दिनाचा वर्धापन दिन आज कोंकण भवन येथे जल्लोषात साजरा झाला. यावेळी कोंकण विभागीय महसूल आयुक्त पी.वेलरासू यांच्या हस्ते कोंकण भवन प्रांगणात सकाळी ०९.०५ वाजता ध्वजारोहण संपन्न झाले.

या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून आमदार मंदाताई म्हात्रे, अपर आयुक्त कोकण विभाग विकास पानसरे, उपायुक्त (महसूल) विवेक गायकवाड, उपायुक्त (सामान्य प्रशासन) संजीव पालांडे, उपायुक्त (पुनर्वसन) अमोल यादव, उपायुक्त (रोहयो) श्रीमती रेवती गायकर, उपायुक्त (विकास) गिरीश भालेराव, उपायुक्त (आस्थापना) मिनल कुटे,उपायुक्त (नियोजन) प्रमोद केंभवी, उपायुक्त (पुरवठा) अनिल टाकसाळे, कोकण विभागीय माहिती उपसंचालक डॉ.गणेश मुळे, वैद्यकीय अधिकारी डॉ.गणेश धुमाळ, पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती, माजी सैनिक, शासकीय अधिकारी, कर्मचारी व नागरीक तसेच शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित होते.

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या वर्धापन दिनानिमित्त कोकण भवन इमारतीच्या प्रांगणात हर घर तिरंगा या उपक्रमांतर्गत कोकण भवन इमारतीच्या आवारात भव्य दिव्य असा मंच उभारून वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यावेळी कोकण भवन इमारत तिरंगी रंगाच्या रोषणाईने सजवण्यात आली होती. हर घर तिरंगा या संकल्पनेवर आधारित आकर्षक असे शुभेच्छा संदेश देणारी रांगोळी आणि सेल्फी पॉईंट इमारतीच्या आवारात उभारण्यात आले होते.

यावेळी महसूल पंधरवड्यानिमित्त महसूल संवर्गातील पुनर्वसन शाखेचे उपायुक्त अमोल यादव, मुख्यमंत्री सचिवालय कक्षाच्या नायब तहसिलदार दिपाली पुरारकर, नायब तहसिलदार सुहास सावंत यांच्यासह लघुलेखक संवर्ग, वरिष्ठ लेखापाल संवर्ग, अव्वल कारकून संवर्ग, महसूल सहाय्यक संवर्ग, आणि महसूल मित्र अशा उत्कृष्ट अधिकारी व कर्मचारी यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

पोलीस सेवेत उत्कृष्ट कार्य करणारे नेरुळ पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक आकाश धनसिंग ठाकरे, तुर्भे पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक किरण भगवान वाघ आणि तुकाराम सुरेश नांगरे, वाशी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक रमेश आनंदा पाटील, सानपाडा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक अमोल रामराव मुंडे, कळवा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक सतीश शाहूराव नवले, नाव्हाशेवा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक शिवाजी भरत पोफळे यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

# ५०० ज्येष्ठ नागरिकांना मधुमेह तपासणी यंत्राचे मोफत वाटप

ठाणे : राष्ट्रवादी युवक काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे ठाणे कार्याध्यक्ष मयूर शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त सुमारे ५०० मधुमेह तपासणी यंत्राचे मोफत वाटप करण्यात आले. शिंदे यांच्या या स्त्युत्य उपक्रमाबद्दल परिसरात त्यांचे कौतूक होत आहे.

बुधवारी सावरकर नगर, लोकमान्य नगर परिसरात मयूर शिंदे यांचा वाढदिवस शहराध्यक्ष सुहास देसाई, मा. नगरसेवक अमीत सरैय्या, शिवाजी ठाकूर, उर्जित शेठ आणि सचिन पंधेरे यांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. यावेळेस परिसरातील शेकडो नागरिक उपस्थित होते.



सध्याच्या बदलत्या जीवनशैलीमुळे मधुमेहाचे रूग्ण वाढीस लागले आहेत. या रूग्णांना नियमित रक्ततपासणी करावी लागते. या रक्ततपासणीसाठी मोठ्या प्रमाणात खर्च होत असतो. गोरगरीब घरातील रूग्णांना दर आठवड्याचा खर्च परवडत नसल्याने मयूर शिंदे यांच्या मित्र परिवाराने परिसरातील सुमारे ५०० मधुमेहींना हे यंत्र वाटप केले. या कार्यक्रमाचे आयोजन मयूर शिंदे यांच्या मातोश्री अनिता शिंदे आणि मयूर शिंदे मित्र परिवाराने केले होते.




देशाच्या ७८ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश स्कुल आणि ज्युनिअर कॉलेजमध्ये स्कुल कमिटीचे चेअरमन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी पनवेल महानगरपालिकेचे माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, विकास घरत, राजेश गायकर, प्रदीप भगत, ॲड. आशा भगत, मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे, अविनाश कुलकर्णी, रयत शिक्षण संस्थेचे पीआरओ बाळासाहेब कारंडे, संतोष गुजर यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

शिवसेना उपनेते स्व. अनंत तरे साहेबांनी आझादनगर शिवसेना शाखेत सुरु केलेला ध्वजारोहण समारंभ भारतच्या स्वातंत्र्याच्या ७८ व्या अमृत महोत्सवानिमित्त शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शिवसेना ठाणे शहर समनव्यक मा. नगरसेवक संजय तरे यांच्या शुभहस्ते मोठ्या आनंदात, उत्साहात साजरा करण्यात आला. ध्वजारोहण संपन्न झाल्यानंतर लहान मुलांना चॉकलेट वाटप माजी नगरसेविका शिवसेना ठाणे जिल्हा महिला उपसंघटक महेश्वरी तरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विभाग समन्वयक योगेश भोईर, विभागप्रमुख मयुर पैलकर, राजापुर शहर संपर्कप्रमुख व उप विभागप्रमुख सत्यवान कदम, उप विभागप्रमुख दादु शिंदे, मनोज पाटील, महिला विभाग संघटक वैशाली मोरे, उप विभाग संघटक अनुराधा चव्हाण, शाखाप्रमुख संतोष दंत, महिला शाखाप्रमुख जया बामगुडे, दर्शना शिंदे, भक्ती भोईर, उप शाखाप्रमुख मंदार घोरपडे, सचिन आरडे, युवासेना शाखा अधिकारी सागर माने, नंदु गिरी, बौध्द नागरिक सेवा मंडळ जगदाळे मास्तर, आंधळे गुरुजी, संतोष गवई, बाबु देशमुख, मयुरी कदम, मनाली दळवी आणि परिसरातील नागरिक व शिवसैनिक माठ्या संख्येने उपस्थित होते.





स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने जिल्हा परिषदचे प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या शुभहस्ते जिल्हा परिषदेचे प्रांगणात ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रध्वजाला सलामी देऊन राष्ट्रगीत गायन करण्यात आले. या प्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचारी यांना स्वातंत्र दिनाच्या सदिच्छा दिल्या. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रुपाली सातपुते, प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा. प्र) अविनाश फडतरे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरडकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे, कार्यकारी अभियंता बांधकाम संदीप चव्हाण, जिल्हा जलसंधारण अधिकारी दिलीप जोकार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. समिर तोडंणकर, जिल्हा कार्यक्रम अधिकारी संजय बागुल, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) ललिता दहितुले, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे, कृर्षी विकास अधिकारी रामेश्वर पाचे, उप अभियंता संजय सुकटे, सहायक गट विकास अधिकारी पंडीत राठोड तसेच इतर सर्व विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'घरोघरी तिरंगा मॅरेथॉन' रॅलीस धावपटूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद







ठाणे (मेधा भोईटे) : स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या 'घरोघरी तिरंगा' या अभियानातंर्गत गुरूवार, १५ ऑगस्ट रोजी ठाणे महापालिका व ठाणे जिल्हा हौशी ॲथलेटिक्स संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने तिरंगा मॅरेथॉन, बाईक आणि सायकल रॅली आयोजित करण्यात आली होती. महापालिका मुख्यालय येथून आमदार संजय केळकर आणि महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी या सर्व रॅलींना हिरवा झेंडा दाखवून प्रारंभ केला. यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त (क्रीडा) मीनल पालांडे, उपायुक्त (समाज विकास) अनघा कदम, रिमा देवरुखकर, यांच्यासह महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

'घरोघरी तिरंगा' या अभियानातंर्गत आयोजित केलेल्या ५ कि.मी, ३ कि.मीच्या तिरंगा रॅलीत विविध शाळांतील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. महापालिका मुख्यालय येथून सुरू झालेली ५ कि.मी. स्पर्धा नितीन जंक्शन, सर्व्हिस रोड, कोरम मॉल, कॅडबरी जंक्शन, सत्कार रेसीडन्सी, वर्तकनगर सिग्नल, एमआरआर हॉस्पिटल येथून पुन्हा त्याचमार्गे महापालिका भवन येथे समाप्त झाली. तर ३ कि.मी स्पर्धा महापालिका मुख्यालय येथून सुरू होवून नितीन जंक्शन, सर्व्हिस रोड, वाहतूक शाखा कार्यालय, विठ्ठल सायन्ना मंदिर, हरि निवास सर्कल, आराधना टॉकीज, अरुणकुमार वैद्य चौक येथून महापालिका भवन येथे समाप्त झाली.

सायकल रॅलीत 'आम्ही सायकलप्रेमी फाऊंडेशन'चे ०७ वर्षापासून ते ७० वर्षापर्यंतचे सायकलप्रेमी सहभागी झाले होते. तर, बाईक रॅलीतही मोठ्या प्रमाणावर नागरिक सहभागी झाले होते. सर्व सहभागी सायकलपटू आणि बाईकस्वार यांना सहभागाची पदके देऊन गौरविण्यात आले. राईड फॉर कॉज ॲथलेटिक असोसिएशन, पोलीस आणि वाहतूक पोलीस यांच्या सहकार्याने या मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१